संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांतर्गत होलार समाजासाठी उपकंपनीची (Subsidiary) स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक -चविम-२०२३/प्र.क्र.१३०/महामंडळे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१५ ऑक्टोबर, २०२४.

प्रस्तावना:-

होलार समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची मागणी गेली अनेक वर्षापासून लोकप्रतिनिधी, विविध संघटना यांचेकडून केली जात आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील होलार समाजाची एकूण लोकसंख्या १,०८,९०८ इतकी आहे. सदर लोकसंख्येचे प्रमाण महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या ०.८२ टक्के इतके आहे.

सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या महामंडळांपैकी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई हे अनुसूचित जातींमधील चर्मकार समाजातील ढोर, चांभार, होलार,मोची या जातींच्या विकासासाठी विविध योजना राबविण्याचे काम करीत आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट तसेच राज्यातील प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये रहिवाशी असलेल्या होलार समाजातील व्यक्तींकरिता संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा (बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना, महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना) लाभ मिळून होलार समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी व आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करण्याकरिता संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांतर्गत उपकंपनी म्हणून होलार समाज आर्थिक विकास महामंडळाची (उपकंपनी) स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गाची सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी यासाठी सध्या कार्यरत असलेल्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळात समाविष्ट असणाऱ्या होलार

समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांतर्गत उपकंपनी स्थापन करण्यास शासन मान्यता देत आहे. सदरची उपकंपनी "होलार समाज आर्थिक विकास महामंडळ (संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची उपकंपनी)" या नावाने संबोधले जाईल. सदर उपकंपनीचे कामकाज हे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाकडून चालविण्यात येईल.

अ) उपकंपनीची रचना (राज्यस्तर/जिल्हास्तर)

उपकंपनीचे मुख्यालय मुंबई येथे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी राहील.

महामंडळाचे संचालक मंडळावर अध्यक्ष व उपाध्यक्षांसह तीन अशासकीय सदस्य व तीन शासकीय सदस्य राहतील :-

| | | |
|---|---|---|
| १. | शासन नियुक्त पदाधिकारी<br>संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई यांचे अध्यक्ष | अध्यक्ष |
| २. | शासन नियुक्त पदाधिकारी<br>संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई यांचे उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३. | मा. अपर मुख्य सचिव /मा.प्रधान सचिव/ मा.सचिव<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई | संचालक |
| ४. | मा. सहसचिव /मा.उपसचिव<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई | संचालक |
| ५. | व्यवस्थापकीय संचालक,<br>संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई | संचालक तथा व्यवस्थापकीय संचालक |
| ६. | अशासकीय सदस्य – ३ | संचालक |

ब) उपकंपनीचे कार्य:

१. राज्यातील होलार समाजाच्या कल्याण व विकासासाठी काम करणे.
२. होलार समाजाच्या व्यक्तींना अल्प व्याज दराने स्वयंरोजगाराकरिता कर्ज उपलब्ध करुन देणे व त्याची वसूली करणे.
३. होलार समाजाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पतसाधने, साधनसामुग्री आणि तांत्रिक व व्यवस्थापकीय साधने पुरविणे.
४. होलार समाजासाठी उत्पादने, वस्तु, साहित्य आणि सामुग्री यांची निर्मिती, जुळवणी व पुरवठा यासाठी आवश्यक वाटतील अशा सेवा देणे.

५. राज्यातील होलार समाजाच्या कल्याणासाठी योजना सुरु करणे आणि त्यांना चालना देणे व योजनांसाठी अहवाल तयार करणे.

२. या शासन निर्णयानुसार होलार समाज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) स्थापन करण्याबाबतची कार्यवाही प्रचलित कायदे व नियमानुसार संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत करण्यात येईल.

३. सद्य:स्थितीत संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत चर्मकार प्रवर्गासाठी ज्या योजना राबविल्या जात आहेत त्या सर्व योजना होलार समाजासाठी स्वतंत्रपणे राबविल्या जातील.

४. सन २०२४-२५ या आर्थिक होलार समाज आर्थिक विकास महामंडळ या उपकंपनी करिता संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या भागभांडवली लेखाशिर्ष (४२२५-००४२) मधून आवश्यक तरतूद मंजूर करण्यात येईल. उपकंपनीकरिता आवश्यक पदनिर्मिती (आकृतीबंध) व आर्थिक तरतूद याबाबत विभागाकडून स्वतंत्ररित्या कार्यवाही करण्यात येईल. तसेच मुख्य कंपनीच्या आस्थापनेवरील पदाच्या कार्यभार व निकषानुसार उपकंपनीतील मंजूर पदाकरिता कार्यभार व निकष लागू राहतील.

५. होलार समाज आर्थिक विकास महामंडळ या उपकंपनीचे मुख्यालय मुंबई येथे सध्याच्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या मुख्यालयांतर्गत राहील.

६. जिल्हा स्तरावरील कामकाजासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांच्या जिल्हा कार्यालयातील मंजूर अधिकारी/कर्मचाऱ्यांकडूनच उपकंपनीचे कामकाज करण्यात येईल

७. सद्य:स्थितीत संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे सध्याचे व्यवस्थापकीय संचालक हे या उपकंपनीचे सध्याचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पाहतील.

८. सद्य:स्थितीत होलार समाज आर्थिक विकास महामंडळाचे (उपकंपनी) नोंदणीकृत कार्यालय मुंबई येथे राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वर्षा देशमुख)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)

३. व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई
४. सर्व जिल्हा व्यवस्थापक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या., मुंबई
५. महालेखापाल (लेखा व /लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२. मुंबई/नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, ठाणे.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई.
१०. वित्त विभाग (कार्यासन व्यय १४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ), मंत्रालय, मुंबई.
११. सहसंचालक, लेखा व कोषागारे, (संगणक कक्ष), नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई.
१२. कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती/महामंडळे.